**स्मार्ट सिटी अभियानात पहिल्या टप्यात राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीमार्फत शिफारस करण्यात आलेल्या १० शहरांपैकी पहिल्या फेरीत निवड न झालेल्या इतर ८ शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्र. स्मार्टसि-२०१६/अनौस- ५८/प्र.क्र.२६१/नवि-२३**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- १८ जुन, २०१६

<u>संदर्भ :</u>- (१) शासन निर्णय क्र.स्मार्टसि-२०१५/प्र.क्र.२२१/नवि-३३,दिनांक २१.०८.२०१५

(२) शासन निर्णय क्र. स्मार्टसि.-पुणे-२०१६/प्र.क्र.९४/नवि-२३, दिनांक १४.३.२०१६

(३) शासन निर्णय क्र. स्मार्टसि.-सोलापूर-२०१६/प्र.क्र.११२/नवि-२३, दिनांक १४.३.२०१६

(४)शासन निर्णय क्र. स्मार्टसि.-मनपा-२०१६/प्र.क्र.९४/नवि-२३, दिनांक ११.४.२०१६

(५) शासन निर्णय क्र. स्मार्टसि.-मनपा-२०१६/प्र.क्र.११२/नवि-२३, दिनांक ११.४.२०१६

(६)शासन निर्णय क्र. स्मार्टसि.-मनपा-२०१६/प्र.क्र.१७७/नवि-२३, दिनांक १८.५.२०१६

**<u>प्रस्तावना</u> :-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी घोषित केल्यानुसार स्मार्ट सिटी अभियानात पहिल्या टप्यात राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीमार्फत शिफारस करण्यात आलेल्या १० शहरांपैकी पहिल्या फेरीत निवड न झालेल्या इतर ८ शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता राज्य शासनाच्या महामंडळाकडुन निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी योजनेत राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने खालील १० शहरांची निवड केली आहे. :-

| अ.क्र. | शहराचे नाव |
|---|---|
| १. | नवी मुंबई |
| २. | पुणे- पिंपरी चिंचवड नागरी समूह |
| ३. | नाशिक |
| ४. | बृन्हमुंबई |
| ५. | ठाणे |
| ६. | नागपूर |
| ७. | अमरावती |
| ८. | सोलापूर |
| ९. | कल्याण-डोंबिवली |
| १०. | औरंगाबाद |

योजनेच्या प्रथम टप्यात केंद्र शासनाने गुणानुक्रमे २ व ९ क्रमाने पुणे व सोलापूर या शहरांची स्मार्ट सिटी अभियानाकरीता निवड केली आहे. या दोन शहरांमध्ये स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता केंद्र शासन/राज्यशासन व महानगरपालिकांचा निधी प्राप्त होणार आहे. (५० टक्के : २५ टक्के : २५ टक्के या प्रमाणात) तसेच संदर्भ क्रमांक २ व ३ च्या शासन निर्णयान्वये स्मार्ट सिटी अभियान अमलात आणण्याकरीता विशेष उद्देश वाहन (एस. पी. व्ही.) चे गठन करण्यात आले आहे.

उर्वरीत ८ महानगरपालिकांचा समावेश स्मार्ट सिटी अभियानाच्या पुढच्या फेरींमध्ये होणे अपेक्षित आहे. परंतु स्मार्ट सिटी अभियानाचा महानगरपालिकांच्या शहर विकासामुळे होणारा सकारात्मक बदल ही बाब विचारात घेता राज्यातील उर्वरीत ८ महानगरपालिकांमध्ये स्मार्ट सिटी अभियान या आर्थिक वर्षापासून राबविणे आवश्यक आहे असे शासनाचे मत आहे.

उक्त ८ महानगरपालिकांमध्ये विविध स्रोतानून निधी उपलब्ध करुन स्मार्ट सिटी अभियान राबविण्याचा शासनाचा मानस आहे. यास्तव खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**<u>शासन निर्णय :-</u>**

१) बृहन्मुंबई महानगरपालिका व नवी मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याने या महानगरपालिकांनी स्मार्ट सिटी अभियान त्यांच्या स्वनिधितून राबविणे आवश्यक आहे.

२) उर्वरीत ६ महानगरपालिका म्हणजेच ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांनी स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता या महानगरपालिकांना केंद्र हिस्सा रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व सिडको यांनी खाली विर्निदिष्ट केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | शहराचे नाव | केंद्र निधी ऐवजी उपलब्ध करावयाचे निधी स्रोत (रुपये १०० कोटी प्रती महानगरपालिका) |
|---|---|---|
| १. | नाशिक | सिडको |
| २. | औरंगाबाद | सिडको |
| ३. | नागपूर | सिडको |
| ४. | अमरावती | सिडको |
| ५. | कल्याण-डोंबिवली | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |
| ६. | ठाणे | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण |

३) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना क्र. १०.६ नुसार विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) च्या स्थापनेस मान्यता देण्यात येत आहे.

४) केंद्र शासनाने स्मार्ट सिटी अभियानात प्रथम टप्यात निवडलेल्या पुणे व सोलापूर या व्यतिरिक्त खालील ८ महानगरपालिकांमध्ये सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात यावे.

५) उक्त रुपये १०० कोटींपैकी विशेष उद्देश वाहन (एस. पी. व्ही.) गठीत केल्यानंतर पहिल्या वर्षी रुपये ५० कोटी प्रती महानगरपालिका इतका निधी संबंधित महानगरपालिकांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण / सिडको यांनी उपलब्ध करुन द्यावे.

६) या उक्त ८ महानगरपालिकांनी स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरीता विशेष उद्देश वाहन (एस. पी. व्ही.) चे गठन तात्काळ करणे आवश्यक राहील. कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नव्याने गठीत विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) ही शासकीय (Government Company) कंपनी असेल.

७) विशेष उद्देश वाहन (एस. पी. व्ही.) ची रचना खालीलप्रमाणे असेल.

I) उक्त विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) यांच्या रचनेत महानगरपालिका, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार, स्वतंत्र संचालक यासह १५ संचालक मंडळास मान्यता देण्यात येत आहे. सदर संचालक मंडळातील विविध भागधारक (Stakeholders) यांचे संचालक मंडळातील प्रतिनिधीत्वास खालील मान्यता देण्यात येत आहे :-

- संबंधित महानगरपालिका ६ संचालक
- महाराष्ट्र शासन ४ संचालक
- केंद्र शासन १ संचालक
- २ स्वतंत्र संचालक (या संचालकाची निवड केंद्रीय कंपनी व्यवहार, मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या संचालकाच्या डेटा बँकमधून करण्यात येईल.)
- संबंधित महानगरपालिका आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून)

  आणि

  बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता स्माट सिटी विषयाचे कामकाज पाहणारे अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
- मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.)

उक्त रचनेच्या अनुषंगाने विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) मध्ये खालील प्रमाणे संचालक, नामनिर्देशीत करण्यात येत आहेत:-

अ) संबंधित महानगरपालिका:-

१) महापौर, संबंधित महानगरपालिका
२) अध्यक्ष, स्थायी समिती संबंधित महानगरपालिका
३) सभागृह नेता, संबंधित महानगरपालिका
४) विरोधी पक्षनेता, संबंधित महानगरपालिका

तसेच व्यापक राजकीय प्रतिनिधीत्व देण्याच्या उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) वर प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे याकरीता वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशित संचालक म्हणून नियुक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/राज्य मान्यताप्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक या प्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशित करण्यात येतील.

ब) शासनाचे खालील प्रतिनिधी नव्याने गठीत विशेष उद्देश वाहन (SPV) वर शासनाचे प्रतिनिधीत्व करतील.

| **अ.क्र.** | **शहराचे नाव** | **स्मार्ट सिटी अभियानाकरीता नियुक्त केलेले मार्गदर्शक (Mentor) हे विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) संचालक मंडळाचे अध्यक्ष असतील.** | **इतर सदस्य** |
|---|---|---|---|
| १. | बृन्हमुंबई | श्री. अजॉय मेहता, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | १) पोलिस आयुक्त, मुंबई<br>२) अतिरीक्त आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>३) अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका (स्मार्ट सिटी विषयाचे कामकाज पाहणारे)<br>४) जिल्हाधिकारी, मुंबई शहर |
| २. | नवी मुंबई | श्री. भूषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको | १) पोलिस आयुक्त, नवी मुंबई<br>२) सह कार्यकारी संचालक, सिडको<br>३) जिल्हाधिकारी, ठाणे |
| ३. | नाशिक | श्री. सिताराम कुंटे, प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) | १) पोलिस आयुक्त, नाशिक<br>२) सह कार्यकारी संचालक, सिडको<br>३) जिल्हाधिकारी, नाशिक |
| ४. | औरंगाबाद | श्री. अपूर्व चंद्रा, प्रधान सचिव (उद्योग व उर्जा विभाग) | १) जिल्हाधिकारी, औरंगाबाद<br>२) पोलिस आयुक्त, औरंगाबाद<br>३) सह कार्यकारी संचालक, सिडको |
| ५. | नागपूर | श्री. प्रविण परदेशी, मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव | १) पोलिस आयुक्त, नागपूर<br>२) अध्यक्ष, नागपूर सुधार प्रन्यास,नागपूर<br>३) जिल्हाधिकारी, नागपूर |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | अमरावती | श्री. सुनिल पोरवाल, अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग | १) पोलिस आयुक्त, अमरावती<br>२) जिल्हाधिकारी, अमरावती<br>३) सह संचालक, नगररचना, अमरावती विभाग |
| ७. | कल्याण-डोंबिवली | यु.पी.एस. मदान, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण | १) पोलिस आयुक्त, ठाणे<br>२) अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>३) जिल्हाधिकारी, ठाणे |
| ८. | ठाणे | श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (महसूल विभाग) | १) पोलिस आयुक्त, ठाणे<br>२) अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण<br>३) जिल्हाधिकारी, ठाणे |

(II) विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) चे गठन करण्याकरीता आवश्यक असलेले सुरुवातीचे भाग भांडवल रुपये पाच लाख इतक्या रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

यापैकी शासनाचा ५० टक्के वाटा म्हणून रुपये अडीच लाख इतक्या रकमेच्या भाग भांडवलास मान्यता देण्यात येत आहे. सदर भाग भांडवल आवश्यकतेनुसार वाढविण्यास विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) मुभा असेल.

III) विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) करीता संबंधित महानगरपालिका व शासन यांचे समसमान भागभांडवल असणे आवश्यक आहे. संबंधित महानगरपालिकेच्या ५० टक्के हिश्याकरीता खालील ६ भागधारक निर्देशित करण्यात येत आहेत :-

(१) आयुक्त, संबंधित महानगरपालिका आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी अतिरीक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका (स्मार्ट सिटी विषयाचे कामकाज पाहणारे)

(२) महापौर, संबंधित महानगरपालिका

(३) उप महापौर, संबंधित महानगरपालिका

(४) अध्यक्ष, स्थायी समिती, संबंधित महानगरपालिका

(५) सभागृह नेता, संबंधित महानगरपालिका

(६) विरोध पक्षनेता, संबंधित महानगरपालिका

शासनाच्या ५० टक्के हिश्याचे एकमेव भागधारक म्हणून विभागीय आयुक्त, संबंधित महसुल विभाग यांना नामनिर्देशित करण्यात येत आहे.

IV) कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत गठीत कंपनीचे विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) नाव काय असावे याबाबतचे अधिकार संबंधित महानगरपालिकांच्या आयुक्तांना असतील.

V) उक्त विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) चे नोंदणीकृत कार्यालय संबंधित महानगरपालिकेची मुख्य इमारतीत असेल.

VI) कंपनी नोंदणी संदर्भात अर्ज व इतर सर्व कायदेशीर कादगपत्रे यांचेवर संबंधित महानगरपालिका व राज्य शासनाच्यावतीने संबंधित महापालिका आयुक्त यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

VII) अर्टीकल ऑफ असोशिएशन आणि मेमोरेन्डम ऑफ असोशिएशन मधील मसुद्यास केंद्रशासन, राज्यशासन व रजिस्ट्रार ऑफ कंपनीज यांनी भविष्यात सूचविलेल्या दुरुस्तीस संबंधित महानगरपालिका व राज्य शासनाच्यावतीने महापालिका आयुक्त यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

VIII) सदर विशेष उद्देश वाहनाचे (एस. पी.व्ही.) लेखा परिक्षण भारताच्या महालेखापाल यांचे मार्फत करण्यात यावे.

IX) सदर कंपनीला राज्य शासनाचे खरेदी विषयक धोरण (State Procurement Policy) लागू राहील.

X) नव्याने गठीत केलेल्या विशेष उद्देश वाहनास (एस. पी.व्ही.) महानगरपालिकेच्या मान्यतेने कर्जे उभी करण्याची मुभा असावी. सदर कर्जास विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) व महानगरपालिका यांची संपूर्ण जबाबदारी असेल. विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) घेतलेल्या कोणत्याही कर्जास शासनाची हमी असणार नाही अथवा सदर कर्जाप्रित्यर्थ राज्य शासनाचे कोणतेही दायित्व असणार नाही.

XI) विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) यांना एकूण रुपये ५० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या पी. पी. पी. प्रकल्प केवळ शासनाच्या उच्चाधिकार समितीच्या पूर्व मान्यतेनेच राबविता येईल.

XII) विशेष उद्देश वाहनाचे (एस. पी.व्ही.) मुख्य कार्यकारी अधिकारी हे शासकीय अधिकारी असतील आणि भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा नियुक्तीसाठी प्राधान्याने विचार केला जाईल अथवा त्यांची निवड रितसर जाहिरात देऊन शासनाने निश्चित केलेल्या अर्हतेनुसार शासनाच्या पूर्व मान्यतेने करण्यात यावी.

XIII) सदर विशेष उद्देश वाहनाचे (एस. पी.व्ही.) स्थापना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६६ (अ) व ६६ (४१-अ) च्या तरतुदीनुसार करण्यात येत आहे.तसेच सदर विशेष उद्देश वाहनाच्या (एस. पी.व्ही.) संरचना व

कार्यपध्दतीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या तरतुदीनुसार वेळोवेळी निर्देश देण्याचे अधिकार राज्यशासनाकडे असतील.

XIV) संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी वरील निर्णयातील तरतुदी Model Article of Association मध्ये अंतर्भुत करण्याची खबरदारी घ्यावी.

XV) Article of Association मध्ये काहीही नमुद केलेले असले तरी केंद्र शासन, राज्य शासनाने दिलेल्या सूचना निदेश, आदेश उक्त विशेष उद्देश वाहनावर बंधनकारक राहतील. (Over Riding Effect ) अशी तरतुद कंपनीच्या Article of Association मध्ये अंतर्भुत करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१६०६१८१७२२२४८२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ajit Malhari Kawade

Digitally signed by Ajit Malhari Kawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=597d3c4c02c1add96119d79fc4b21063ef289863535a77211cf42daa12e539dd, serialNumber=49349d578c976e0d05a9793ef412604378bdf9fed13d605caba002427a7c370b, cn=Ajit Malhari Kawade
Date: 2016.06.18 17:26:01 +05'30'

**(अजित म.कवडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (उर्वरीत सर्व), मंत्रालय, मुंबई
६. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री सर्व विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९. श्री.अजॉय मेहता, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मंत्रालय, मुंबई
१०. श्री.सुनिल पोरवाल, अपर मुख्य सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. श्री.यु.पी.एस.मदान, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
१२. श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. श्री.भुषण गगराणी, व्यवस्थापकीय संचालक, सिडको,
१४. श्री.सिताराम कुंटे, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई
१५. श्री.प्रविण परदेशी, मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव

१६. श्री.अपुर्व चंद्रा, प्रधान सचिव, उद्योग व उर्जा विभाग,
१७. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१, मंत्रालय, मुंबई
१८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. सचिव, (नगर विकास-२), मंत्रालय, मुंबई
२०. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई
२२. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपुर
२३. सर्व विभागीय आयुक्त
२४. जिल्हाधिकारी, मुंबई / ठाणे / नाशिक / औरंगाबाद / नागपुर / अमरावती
२५. सर्व जिल्हाधिकारी
२६. उप सचिव (अर्थसंकल्प), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. आयुक्त, ठाणे/नाशिक / नवी मुंबई / औरंगाबाद/ नागपुर/ कल्याण-डोंबिवली/ अमरावती महानगरपालिका
२८. निवड नस्ती, नवि-२३.